दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● रविवार २१ एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २४८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# धनगर आरक्षणाची याचिकाही सुप्रीम कोर्टाने फेटाळली

## सरकारने धनगर समाजाच्या अंगावर भंडारा उधळन्या ऐवजी डोळ्यात टाकला-अशोक हिंगे

**वादळवार्ता/बीड**

धनगर समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करावा या मागणीसाठी धनगर समाज अनेक दिवसापासून उपोषण आंदोलन करत आहे सरकारमधील भारतीय जनता पार्टीचे अनेक नेते धनगर समाजाला एसटीतून आरक्षण मिळवून देऊच अशी वलग्ना करीत होते मात्र शेवटी सरकारच्या दुर्लक्षितपणामुळे धनगर समाजाच्या नशिबी निराशाच आली सुप्रीम कोर्टाने धनगर आरक्षणाची याचिका फेटाळली हे सर्व सरकारचे अपयश आहे असे प्रतिपादन बीड लोकसभेचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी केले

पुढे बोलताना हिंगे यांनी सांगितले की भोळा भाबडा धनगर समाज रानोमाळ भटकंती करत आपली उपयोजिका भागवत होता धनगर समाज शिक्षणाच्या प्रवाहात नोकरीच्या प्रवाहात यावा म्हणून गेली अनेक दिवसापासून धनगर समाजाचे एसटी प्रवर्गात समावेश करण्यासाठीचे आंदोलन चालू होते उपोषण चालू होते यावेळी सत्तेत असलेल्या भाजपाने आम्ही सत्तेत आल्यावर पहिल्याच बैठकीत आरक्षण देऊ असे म्हणणाऱ्या भाजपने सत्ता येऊन ही धनगर आरक्षण देण्यास टाळाटाळ केली शेवटी धनगर आरक्षणाचे प्रकरण ही न्यायप्रविष्ट झाले धनगड आणि धनगर हा शब्द भेद दुरुस्त करून देण्याचे काम शासनाचे होते मात्र ते काम भाजपा सरकारने केले नाही म्हणून आज सुप्रीम कोर्टानेही धनगर आरक्षणाची याचिका फेटाळी जे मराठा आरक्षणाचे केले तेच धनगर आरक्षणाचे केले त्यामुळे भाजपा सरकार मराठा आणि धनगर समाजाला



वापरून घेत होते हेच यावरून दिसून येत आहे त्यामुळे येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत धनगर व मराठा समाजाने भाजपा पुरस्कृत महायुतीच्या नेत्यांना आता त्याची जागा दाखवून देण्याची गरज आहे मराठा आरक्षणात गुलाल उधळून तोंडाला पाने पुसली तर धनगर आरक्षणात भंडारा अंगावर टाकण्याऐवजी डोळ्यात टाकण्याचे काम या सरकारने केले आहे त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत महायुतीला आता जागा दाखवून देण्याची वेळ आली आहे असे मत वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी केले आहे.

## आरोग्य सेवा कर्मचारी पतसंस्थेला १,२३, ६२,९५७ इतका नफा-संस्थापक मधुकर पाटील



**दैनिक वादळ वार्ता**
**कुडूत्री/सुभाष चौगुले**

कोल्हापूर जिल्हा शासकीय आरोग्य सेवा कर्मचारी/अधिकारी सहकारी पतसंस्थेला चालू वर्षी ढोबळ नफा-रुपये-१,२३,६२,९५७,/- इतका झाला आहे, या आर्थिक वर्षात इतर सर्व खर्च व तरतुदी वजा करता निव्वळ नफा रुपये-१,१९,१२,४५७/-झाल्याची माहिती चेअरमन विजयकुमार खांडेकर आणि व्हा. चेअरमन शशीकुमार पाटील यांनी दिली. संस्थेचे खेळते भांडवल रुपये-३३,५१,०३,३०९/-असून स्व: भांडवल रुपये-१०,३८,८६,८९४/- व ठेवी रुपये-२०,८२,३७,९६९/- आहेत. कर्ज वाटप रक्कम रुपये-२७,२२,२८,५७८/- इतके झाले आहे. मागील वर्षी सभासदांना १५% लाभांश दिला होता. तोच याही वर्षी कायम ठेवण्याचा निर्णय झाल्याची चेअरमन श्री विजयकुमार खांडेकर यांनी सांगितले. एनपीए शून्य टक्के आहे. ढोबळ एनपीए. ०.४८ % आहे. संस्थापक मधुकर श्रीपती पाटील (एम. एस.) यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची वाटचाल सुरू आहे. आपला विश्वास

## राज्यात उष्णतेची लाट येणार थंड पाणी न पिण्याचा सल्ला




**वादळवार्ता/शेख शाकेर**

देशभरात उन्हाळा वाढत असून पुढील काही दिवसात ४० ते ५० अंश सेल्सियस उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. त्यामुळे या उन्हाळ्याच्या दिवसात थंड पाणी किंवा बर्फाचे पाणी पिणे टाळावे आणि साधे पाणी प्यावे असा सल्ला आरोग्य तज्ज्ञांनी दिला आहे. दरम्यान, सध्या मलेशिया, इंडोनेशिया, सिंगापूर आणि इतर देश उष्णतेची लाट अनुभवत आहेत. तापमान ४० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्यावर खूप थंड पाणी न पिण्याचा सल्ला डॉक्टर देतात, कारण असे केल्यास आपल्या लहान रक्तवाहिन्या फुटण्याची किंवा रक्तवाहिन्या अरुंद झाल्याने स्ट्रोकचा झटका येण्याची शक्यता असते. त्याचबरोबर कडक उन्हातून घरी आल्यावर लगेच हात, पाय धुवू नका. त्याआधी किंवा आंघोळ करण्याआधी किमान अर्धा तास थांबा. त्यानंतरच अंघोळ करा, असे न केल्यास त्या व्यक्तीला स्ट्रोकचा झटका येण्याची शक्यता असते, असेही आरोग्य तज्ज्ञांनी सांगितले आहे.

## केज येथे विजय स्पोर्ट्स क्रीडा अकॅडमीचे वतीने उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन



**वादळवार्ता/केज**

केज शहर व तालुक्यातील खेळाडूंसाठी विजय स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने विविध खेळांच्या उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अकॅडमीचे संचालक विनोद गुंड यांनी दिली आहे.

विजय स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने १ मे ते १ जून दरम्यान एक महिन्याचे फुटबॉल, व्हॉलीबॉल, क्रिकेट, योगा, बुद्धीबळ, तायक्वांदो खेळाचे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण आयोजन केले आहे. या शिबिरामध्ये शास्त्रशुध्द पध्दतीने क्रीडा प्रशिक्षण दिले जाणार असून या शिबिरात १४ वर्षाखालील मुला - मुलींना प्रवेश दिला जाणार आहे. हे शिबिर धारूर रस्त्यावरील स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या मैदानावर सकाळी ६ ते ८ या वेळेत होणार आहे. या शिबिरात केज तालुक्यातील खेळाडूनी सहभाग व्हावे. असे आवाहन विजय स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने क्रीडा संयोजक विनोद गुंड यांनी केले आहे.



## बीड भाजपा अल्पसंख्याक तालुकाध्यक्षपदी सलिम जहागिरदार

**वादळवार्ता/बीड**

भारतीय जनता पार्टीच्या अल्पसंख्याक बीड तालुकाध्यक्षपदी सलिम जहागिरदार यांची नियुक्ती मा.खा. प्रितमताई मुंडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देवुन निवड करण्यात आली. तालुक्यातील चौसाळा येथिल सलिम जहागिरदार यांची बीड भाजपा अल्पसंख्याक तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली.यावेळी जिल्हाध्यक्ष राजेद्रं मस्के, बीड जिल्हासरचिटणिस सर्जेराव तांदळे, राज्याचे अल्पसंख्याक उपाध्यक्ष सलीम जहाँगिर,जिल्हाध्यक्ष जे.डी.शहा ,कृषी उत्तपन्न बाजार समितीचे संचालक शरद झोडगे,भाजपा अनुसुचित मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर यांची उपस्थिती होती.या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातुन कौतुक होत आहे तर भाजपा पदाधिकार्याच्यां वतीने त्यांचे ठिकठिकाणी सत्कार करण्यात आले .

## पंकजाताईंना केवळ खासदार म्हणून नाही तर मंत्री म्हणून संसदेत पाठवा

## डॉ.योगेश क्षीरसागर यांचे आवाहन; बीडमध्ये स्वराज्य नगर परिसरात कॉर्नर बैठक

प्रतिनिधी | बीड)

दि.२० : महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून जिल्ह्यासह बीड मतदारसंघात केंद्र सरकारच्या योजना आणता येतील. पंकजाताईंना केवळ खासदार म्हणून नाही तर मंत्री म्हणून संसदेत पाठवावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे. महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ बीड शहरातील स्वराज्य नगर परिसरात शुक्रवारी (दि.२०) कॉर्नर बैठक पार पडली. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, नगरसेवक गणेश वाघमारे, सरपंच अतुल मुंडे, शरद गदळे, दत्ताप्रसाद सानप, आमेर सिद्दीकी, अतुल काळे, दिशांत मोराळे, विकास यादव, माजेद कुरेशी, पवार,



गणेश भोसले, राहुल मुंडे, संतोष पाळवदे, राजाभाऊ क्षीरसागर आदी उपस्थित होते. डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, केंद्र सरकारच्या विविध योजना बीड शहरात देखील राबविल्या जात आहेत. त्यात प्रामुख्याने पंतप्रधान घरकुल योजना राबविली जात आहे. या माध्यमांतून शहरात ३ हजार गोर गरीब जनतेला हक्काचे घरकुल मिळाले. केंद्र सरकारच्या माध्यमातून शहरातून जाणाऱ्या मुख्य रस्त्यांची कामे झाली आहेत. महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना निवडून देऊन केवळ खासदार म्हणून नाही तर मंत्री म्हणून संसदेत पाठवायचे आहे. त्यांच्या माध्यमातून बीड शहरात मोठ्या प्रमाणात विकासाची कामे आणायची आहेत. ती कामे पूर्ण करून देण्याची जबाबदारी ही आमची आहे, त्यासाठी पंकजाताईंना मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचे आवाहन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

### पंकजाताईंना लीड देण्याचा शब्द

आवाहनाला प्रतिसाद देत स्थानिक नागरिकांनी देखील आपण आतापर्यंत आमच्या प्रभागात विविध विकासकामे करून न्याय दिला आता याची परतफेड आम्ही पंकजाताई मुंडे यांना जास्तीत जास्त मताधिक्याने निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचा शब्द दिला. या कॉर्नर बैठकीला स्थानिक नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

संपादकीय

# महिला विश्व

महिला विश्व म्हटले संपूर्ण मानव जात, मानवाची उत्क्रांती, अनेक चढउतार, महिलांचे स्थान, महिलांच्या समस्या, सोशिकता, खंबीरता ,त्यांचे कर्तृत्व, मातृत्व, दातृत्व . प्रत्येक क्षेत्रातील झेप. अशा अनेक विषयांवर मंथन करता येईल.

आपण ज्या पृथ्वीवर राहतो ती पृथ्वीही महिला आहे. भारत मातेलाही महिला म्हणून संबोधले जाते यावरुन मानवी सृष्टीत महिलांचे स्थान आदरणीय व श्रेष्ठ समजले जात असावे.फार पूर्वी महिलांना अत्यंत मानाचे स्थान दिले जात असे. त्यावेळी मातृसत्ताक कुटुंबपद्धती अस्तित्वात होती. गार्गी, मैत्रेयी सारख्या थोर विदुषी होऊन गेल्या. त्यांच्या सारख्या महिलांनी समाजमनावर वेगळाच ठसा उमटवला होता.

कालांतराने या महिला शक्तीचे वर्चस्व पुरुष समूहाला सहन न झाल्याने. स्त्रीयांना दुय्यम दर्जाची वागणूक मिळू लागली. स्त्रीला फक्त उपभोग्य वस्तू समजू लागले. हळूहळू तिला क्षुद्र मानू लागले. तिचे अधिकार कमी होत गेले. तिला हिन दर्जाची वागणूक देणे, अत्याचार करणे यांसारख्या बाबी स्त्रियांच्या नशिबी येवू लागल्या. त्यातूनच एक सोशिक स्त्रीमन तयार झाले. स्त्रिया स्वतः आपल्याच कोशात गुरफटून जावू लागल्या. चूल आणि मूल एवढेच तिचे काम. पुरुषांसमोर स्वतःचे तोंड दाखवू शकत नव्हते. स्त्रियांना कोणतेच स्वातंत्र्य नव्हते. स्वतःचे मतही व्यक्त करता येत नव्हतं.तिची चहुबाजूंनी जणू काही कोंडीच होत असे.

कालांतराने या स्त्रीमनाची व्यथा थोर समाजसुधारक छत्रपती शिवाजी महाराज ,महात्मा फुले, महर्षी कर्वे, राजाराम मोहन रॉय .यांसारख्या महान विभूतींनी जाणली. व स्त्रियांचा उद्धार करण्याचे पवित्र कार्य त्यांनी हाती घेतले. स्त्रियांच्या समस्या उदा.बाल विवाह,सतीची चाल,केशवपण , स्त्रीशिक्षण अशा समस्या सोडविण्यासाठी त्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागला. मात्र न डगमगता आपले कार्य अविरत सुरू ठेवले. त्या समस्या कायमच्या दूर करण्यात यश मिळाले.

पुढे महात्मा ज्योतिबा फुलेंनी सावित्री आईच्या मदतीने स्त्री जीवनात अनन्यसाधारण बदल घडवून आणला. स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली केली. स्त्री जीवनात ज्ञानाचे प्रकाश किरण निर्माण करुन ज्ञानज्योत पेटवून आत्मसन्मान निर्माण केला. आज स्त्रियांनी प्रत्येक क्षेत्र काबीज केले. आपल्या क्षेत्रात आपला ठसा उमटवला. तिने सिद्ध केले. ती कोणत्याच क्षेत्रात मागे नाही. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून अधिक जोमाने आपले प्रत्येक कार्य तेवढ्याच तन्मयतेने व अधिक क्षमतेने पार पाडतांना दिसते. म्हणूनच तिला शक्तीस्वरुपा म्हणणे वावगे ठरणार नाही. स्त्रियांच्या मनात आत्मसन्मान निर्माण करणारे महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीआई फुले हेच स्त्री जीवनाचे अराध्य व परम दैवत म्हणणे वावगे ठरणार नाही.

हळूहळू स्त्रिया नोकरी करु लागल्या.घर सांभाळून नोकरी करणे तारेवरची कसरत करु लागल्या .पण तेवढ्याच सक्षमतेने दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडू लागल्या.राजकारणात त्यांना स्थान मिळाले. ते फक्त नावाला. पदावर स्त्री, काम पाहतो पुरुष अशी स्थिती सर्वत्र पाहायला येत असे. राजकारणात नावाला स्त्री, काम पहतो तिचा पती, वडील किंवा मुलगा. काय अर्थ आहे त्या पदाला? या गोष्टीचा मला खूप राग येत असे. जी स्त्री सक्षम असेल तिलाच उभे केले पाहिजे. नाहीतर आहेच परंपरागत पुरुषाची जागा नसेल तर त्या घरच्या स्त्री ला नावापुरतेच घेणे व कामा स्वतः पाहणे. हे कितपत योग्य आहे. त्यापेक्षा एखादी कर्तव्यदक्ष, कर्तुत्ववान महिला यांना पुढे केले पाहिजे. जेणेकरून ती स्वतः चे निर्णय स्वतः घेऊ शकेल. व उत्तम राजकारण , समाजकारण करु शकेल. गावाचा, पर्यायाने देशाच्या विकासास हातभार लावू शकेल.

आता स्त्रियांच्या जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणला. स्त्री बऱ्यापैकी मुक्त पुणे संचार करु शकते. स्वतःचे मत व्यक्त करु शकते. स्वतः चे निर्णय स्वतः घेऊ शकते. अन्यायाविरुद्ध लढू शकते. आपली बाजू ठामपणे मांडू शकते. समाजकारण, राजकारणातून पुढे येवू शकते. आपले अस्तित्व निर्माण करु शकते. शिक्षणाने सर्वच क्षेत्रात तिने आपला ठसा उमटवला. हे सर्व शक्य झाले ते तिच्यात असलेल्या जिद्द, चिकाटी,साहस, धैर्य, मेहनतीच्या जोरावर. पुन्हा स्त्री शक्तीने सिद्ध करून दाखवले. स्त्री शक्तीची महानता ही विश्वात श्रेष्ठ व महान आहे. म्हणून मला म्हणावेसे वाटते की महिला विश्व हा मानव जातीचा आधारस्तंभ आहे. हा स्तंभ मजबूत ठेवून कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक वारसा जपुया. सदैव महिलांचा सन्मान करुया।।

ललिता जाधव/बिरारीस
पिंपळनेर -धुळे
मो. नं.-९४०५१९१२५६

# अलंकार

अलंकार म्हणजे दागिना. मग हा दागिना माणुसकीचा असू दे, प्रेमाचा असू दे, दातृत्वाचा असू दे.हे सर्व दागिने माणसाला फार शोभून दिसतात.आणि एका स्त्रीला अलंकाराने शोभा येते.

बघा ना माणुसकी जर का माणसात नसेल तर काय होईल हो?

माणुसकी हा विषय काढला की मला प्रार्थना आठवते. उटुंब चित्रपट - माणसाने माणसाशी माणसासम वागणे.

माणूस हा असा आहे की तो माणसाशी माणसाप्रमाणे वागला तर खूप काही वादविवाद होणार नाहीत. माणुसकी असा एक दागिना आहे की माणूस त्यामुळे समाजात उठून दिसतो.

रस्त्यावर एखादी वृद्ध व्यक्ती दिसते आणि त्याला रस्ता ओलांडायचा आहे तर आपण रस्ता ओलांडायला मदत करावी. कोणाचे एक्सीडेंट झाला असेल तर त्याच्याकडे कोणी लक्ष देत नसेल तर आपण स्वतः त्याची काळजी घ्यावी. पोलिसांना फोन करावा. त्याचा जीव वाचेल इतकी आपण काळजी घ्यावी.

बऱ्याचदा असं होतं की एक्सीडेंट झालाय माणसं त्याला टाकून पुढे निघून जातात. कारण काय महत्त्वाचे आहे की पोलिसांचा ससेमीरा मागे लागायला नको. पण या भीतीपोटी पुढे माणूसकी टाकून चालेल का हो.

ही अगदी साधी उदाहरणं दिलेली आहेत माणुसकी या अलंकाराबद्दल.

आता पण प्रेम हा अलंकार पाहू या. प्रेम लहान मुलाचे आईवर आईचे लहान मुलावर. प्रेम वडिलांचे मुलांवर मुलांचे वडिलांवर. आजोबाआज्जीचे नातवावर,नातवांचे आजोबा आज्जीवर, पूर्ण कुटुंबाचे एकमेकांवरील प्रेम. पतीचे पत्नी वरील प्रेम, पत्नीचे पतीवरील प्रेम, प्रेयसीच्या प्रियकरावर प्रेम, प्रियकराचे प्रेयसीवर प्रेम, संपूर्ण मानव जातिचे निसर्गावरील प्रेम. मानवाचे घरावरील प्रेम,प्राण्यांवरील प्रेम, अशी कितीतरी उदाहरण प्रेमाची आपल्याला देता येतील. तर प्रेम हा एक अलंकारच आहे ना. ज्याच्याकडे प्रेमाचा झरा पाझरतो, तो जीवनात उत्साही,आनंदी,टवटवीत असतो.

आता पण दातृत्वाचा वेगळा अलंकार पाहू या. आपण काही जे कमवतो त्यातील थोडासा भाग आपण आपल्या समाजाकरता वापरायला हवा. मग कुठे आर्थिक स्थिति प्रबळ नाही तो समाज. यांना दोन वेळचे अन्न पण नीट मिळत नाही तो समाज. शाळेत जायची इच्छा असते पण फी भरायला पैसे नसतात असा समज. फ्री ॲडमिशन मिळालं तरी वह्या,पुस्तकांचा खर्च तर करावाच लागतो असा समाज. या सर्वांप्रती आपले एक कर्तव्य आहे असं समजून आपण या लोकांसाठी अन्नदान,शैक्षणिक साहित्य दान, वस्त्र दान अशा गोष्टी केल्या पाहिजेत.

पर्यावरणासाठी, वृक्षारोपणासाठी रोप दान सुद्धा आपण केले पाहिजे. म्हणजे निसर्ग भान आपण ठेवून एक सामाजिक बांधिलकी जपू शकतो.

आता स्त्री सौंदर्यामध्ये भर घालणारे जे अलंकार आहेत अलंकारांबद्दल बोलूया.

अलंकार आणि स्त्री यांचे वर्षानुवर्षांचे नाते आहे. सोन्याचे दागिने, हिऱ्याचे दागिने,मोत्याचे दागिने, ऑक्सडाईजचे दागिने आणि आता इमिटेशन ज्वेलरी आलेली आहे. प्रत्येक साडीवर मॅचिंग दागिने आलेले आहेत.

तर असे हे दागिने घालून, अलंकार घालून, स्त्री ही अतिशय सुंदर दिसते.देखणी दिसते.

तर अलंकाराच्या ह्या विविध व्याख्या आहेत. अलंकार मानवाने सजवले तर मानव जीवनामध्ये अतिशय उत्कृष्ट कार्य करू शकतो. समाजाचे ऋण फेडू शकतो. निसर्गाचे ऋण खेळू शकतो. मानवा अलंकार वापर माणुसकीचा झरा वाहू दे अनाथालयी प्रेमाचा आनंद देऊ वृद्धाश्रमात दातृत्वाचा स्त्रीलालोभअसतोया अलंकारांचा....

**वसुधा वैभव नाईक**
**धनकवडी, जिल्हा - पुणे**
**मो. नं.9823582116**

# हनुमान जयंती उत्सव

( चैत्रशुद्ध पौर्णिमा ) ब्राह्मतेज व क्षात्रतेजाचे प्रतीक म्हणजे परमरामभक्त हनुमंत की जे भक्ती , शक्तीसामर्थ्य व बुद्धी यांची प्रेरणा आहे आणि हनुमंत रायची समर्पण वृत्ती पाहूनच प्रभुरामाच्या सीतामाईने हनुमंताला अमरत्वाचे वरदान दिलेले आहे म्हणून हनुमंत हा चिरंजीवी आहे. मनोजवं मारुतीतुल्यवेगं

जितेंद्रियम बुद्धिमतांवरिष्ठम असे प्रभूरामचंद्र यांचा भक्त वीर हनुमंत याचे वर्णन प.पू. रामदास स्वामी यांनी लिहिलेल्या भीमरुपी या मारुतीस्तोत्रामध्ये अत्यन्त प्रासादिक शब्दात केलेले आहे. चैत्रशुद्ध प्रतिपदा म्हणजे गुढीपाडवा “ चैत्रशुद्ध नवमी म्हणजे रामनवमी तर चैत्रशुद्ध पौर्णिमा म्हणजे हनुमान जयंती रामनवमी नंतर बरोबर 15 दिवसांनी रामभक्त हनुमंत यांचा जन्म झाला असून तो सर्वत्र अत्यन्त उत्साहाने साजरा केला जातो. हनुमंत ( मारुती) ही बुद्धी आणी शक्तीची देवता मानली जाते. भारतीय धर्मग्रँथामध्ये रामायण महाभारत या हिंदूंच्या धर्मग्रंथात याचे व त्या कालावधीचे वर्णन केलेले आहे. पौराणिक कथेत उल्लेखील्या प्रमाणे चक्रवर्ती राजा दशरथाने पुत्रप्राप्ती प्रित्यर्थ पूत्रकामेष्ठी यज्ञ केला होता त्या प्रसंगी त्या पवित्र यज्ञातुन प्रत्यक्ष अग्निदेव प्रकट झाले होते व त्यांनी राजा दशरथाच्या तिन्ही म्हणजे कौसल्या , सुमित्रा , कैकयी या महाराण्यासाठी पायस ( खिरीचा प्रसाद ) दिला होता. त्या प्रसादामुळे राजा दशरथाच्या सर्व राण्यांना पुत्रप्राप्ती झाली आणी प्रभूरामचंद्र , लक्ष्मण , भरत , शत्रुघन यांचा जन्म झाला . पण तोच प्रसाद योगायोगाने आकाशात भ्रमण करत असलेल्या एका घारीच्या मार्फत एका वनामध्ये एक वानरस्त्री ध्यानस्थ बसली होती तिच्या ओंजळीत पडला त्या वानरीने तो प्रसाद श्रद्धेने ग्रहण केला आणि त्यातून तिच्या पोटी *हनुमंत ( मारुतीराय ) जन्माला आले ही आख्यायिका आहे. या बाबतचे सर्व दृष्टांत हे पौराणिक ब्रह्मान्ड पुराणात आढळतात. *एकनाथी भागवत ग्रंथात देखील हनुमंताच्या जन्माची कथा वर्णन केली आहे. मारुतीरायाचा जन्म हा अंजनेरी पर्वतावर अंजनीच्या पोटी झाला म्हणून हनुमंताचा उल्लेख अंजनीसुत म्हणून केला जातो . हनुमंताच्या वडिलांना वानरराज केसरी म्हणत असत. हनुमंताला जन्मताच अनेक सिध्दी प्राप्त होत्या. हनुमंत बलाढय , तेजस्वी ,पराक्रमी होता. स्वर्गाधी देव देखील त्याच्या पराक्रमाने भयभीत झाले होते. या पराक्रमी हनुमंताच्या अनेक कथा पुरणात ऐकण्यास मिळतात. पुढे रामायणात प्रभुरामचंद्र वनवासात असताना हनुमंताची व रामसीतालक्ष्मण यांची भेट झाली. पुढील सर्व इतिहास सर्वश्रुत आहे. आजही हनुमंत चिरंजीव आहे. जिथे जिथे रामनाम घेतले जाते, रामस्तुती केली जाते तिथे तिथे प्रत्यक्ष रामभक्त हनुमंत उपस्थित असतात अशी श्रद्धावान लोकांची श्रद्धा आहे.

हनुमंताला मारुती ,, बजरंगबली , अंजनीसूत , महावीर , पवनपुत्र , केशरीनंदन अशा अनेक नावांनी संबोधले जाते. गदा हे त्याचे शस्त्र आहे. त्याला शंकराचा अवतारही मानले जाते. या कलियुगातील संकट हरण करणारी शक्तीदेवता म्हणजे हनुमंत असे मानले जाते. राष्ट्र हे नुसते बुद्धिवादी असून चालणार नाही तर ते सर्वार्थाने बलदंडच असले पाहिजे आणि म्हणून बलोपासना अत्यन्त महत्वाची आहे. हनुमान जयंतीचे महत्व हिंदूधर्मात सर्वत्र असून हनुमंत ही बलोपासनेची देवता मानली जाते. म्हणून संकटे , साडेसाती , दुष्टचक्र , असणाऱ्या व्यक्तींनी हनुमंताची आराधना ( भक्ती ) करावी असे म्हटले आहे. आणि रामभक्त हनुमंत हा चिरंजीव असल्यामुळे तो सदैव आपल्या सोबत अस्तित्वात आहे अशी भक्तांची मनधारणा आहे. हिंदूधर्मात हनुमंताला शक्ती ,स्फूर्ती , ऊर्जा यांचे प्रतीक मानले आहे. हनुमंत म्हणजे परमरामभक्त आणि पृथ्वीतलावरील अक्षयी दास्यभक्तीचे अत्यन्त उत्तम उदाहरण आहे. याची प्रचिती आपण रामायणातील कथा वाचताना येते. अगदी महाभारतात देखील कुरूक्षेत्रावर राम हा कृष्णावतार असल्यामुळे युद्धकाळात रामभक्त हनुमंत हा अर्जुनाच्या रथावर आरूढ झालेला आहे हे दिसून येते. समर्थ रामदास स्वामींना साक्षात प्रभुरामचंद्र यांनी गुरूमंत्रोपदेश दिला होता आणि प्रत्यक्षात आपल्या परमभक्त मारुतीरायाच्या स्वाधीन केले होते. असे म्हणतात... म्हणूनच “आमचे कुळी हनुमंत । हनुमंत आमुचे मुख्य दैवत । त्याविण आमुचा परमार्थ । सिद्धीते न पवे सर्वथा । म्हणूनच समर्थांना धर्मस्थापना करायची होती. त्यासाठी प्रजेमध्ये ज्ञान , भक्ती , आणि शक्ती आवश्यक असल्यामुळे मारुतीरायामध्ये या तिन्ही सत्वगुणांचा संगम होता. मारुतीराय हे सर्वगुण संपन्न होते. त्यामुळे रामदास स्वामींनी या बालब्रह्मचारी वज्र्यदेही हनुमंताची उपासना करून हे सर्व गुण स्वतः आत्मसात करून घेतले होते. आणी समाज बलशाली , निर्भय व्हावा म्हणून सामर्थ्यशाली हनुमंताची उपासना , म्हणजे बलोपासना समर्थांनी रूढ केली.

प.पू. रामदास स्वामी म्हणतात की “सर्वात अत्यन्त वेगवान मन हे आहे आणी अशा प्रचंड वेगवान मनाला पकडण्याचे सामर्थ्य केवळ रामभक्त हा हनुमंतातच आहे.

अशा रामभक्त हनुमतांची जयंती सर्वत्र चैत्रशुद्ध पौर्णिमा ( हनुमान जयंती ) भक्तीपूर्ण भावनेने केली जाते. ईती लेखन सीमा

************************

**वि.ग.सातपुते.( साहित्यिक )**
**संस्थापक अध्यक्ष:-**
**महाकवी कालिदास प्रतिष्ठान पुणे ( महाराष्ट्र )**
**( 9766544908 )**

# सूजलेगाव येथे रविवारी महारुद्र हनुमान मूर्तीची प्राण प्रतिष्ठा व कलशा रोहन सोहळा

## संत, महंत ,वेद पंडित याची उपस्थिती

**वादळवार्ता/नायगाव**
रविवार दि ,२१ एप्रिल रोजी सुजलेगावं तां नायगाव येथे महारुद्र मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा कार्यक्रमाचे भव्य दिव्य आयोजन करण्यात आले असुन या निमित्त संत, महंत, वेद पंडित मंडळी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पहाटे पाच पासून होणार आहे, मोजे सुजलेगांव ता. नायगांव जि. नांदेड येथे भव्य असा नवसाला पावणारा महारुद्र हनुमान मंदिर आहे ग्रामस्थ व संस्थान समिती यांच्या पुढाकारातून या वर्षी भव्य दिव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असुन दि,१७ एप्रिल रामनवमी ते हनुमान जयंती पर्यंत अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे


चैत्र शु. १३ शके १९४६ दि. २१ एप्रिल २०२४ रोज बुधवारी सकाळी ०९ वाजता वेदशास्त्र संपन्न श्री खंडूगुरु जोशी आसवलेकर यांच्या शुभहस्ते होमहावन आग्नी, स्थापना मुर्तीची जलाधीवास, ध्यान दिवस फळ पुष्पादिवास व हवण करण्यात येईल त्यानंतर महाआरती व समस्त देवादी देवांची स्थापना श्री गणपती, श्री महारुद्र (मारोतराया) श्री महादेव, श्री विठ्ठल रुक्माई देवाची स्थापना , श्री गुरुवर्य युदबन महाराज मठसंस्थान कोलंबी,महंत श्री मन्ना महाराज कोलंबीकर,गुरुवर्य रामभारती महाराज मठसंस्थान मोहनपुर, गुरुवर्य हरिओम बाबा,यांच्या हस्ते कलशारोहण सोहळा होणार आहे

दि.२१ एप्रिल २०२४ बुधवार रोजी श्री सुरेश गंगाधर कदम (ग्रामसेवक) यांचामहाद्रसाद कलशारोण सोहळ्या नंतर लगेच..होणार आहे

आखंड हरी नाम सप्ताह मध्ये दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी ६ ते ७ विष्णू सहस्त्रनाम, ७ ते १० ज्ञानेश्वरी ग्रंथराज पारायण, १० ते १ गाथा भजन, दुपारी २ ते ३ प्रवचनकार ह.भ.प. यज्ञश्वर महाराज लाठकर यांचे प्रवचन, सायं. ५ ते ७ हरिपाठ, रात्री ९ ते ११ हरिकिर्तन नंतर जागर होणार आहे,

आता पर्यंत ह.भ.प. श्री सचिन महाराज ढोले छत्रपती संभाजी नगर,ह.भ.प. श्री विजय महाराज गवळी नाशिक,ह.भ.प. श्री चैतन्य महाराज राऊत देवाची आळंदी (बालकिर्तनकार),त्र्यंबक स्वामी यांची कीर्तन सेवा झाली असून आज २१ रोजी ह.भ.प. श्री संतोष महाराज वनवे बीड (कलशारोहण सोहळा)२२/०४/२०२४ सोमवार ह.भ.प. मुक्ताईनाथ खेर्डेकर खेड संस्थान दी,२३/०४/२०२४ मंगळवार हनुमान जयंती निम्मित पहाटे पाच वा, ह भ प दिंगबर महाराज जाधव यांचे कीर्तन तर रात्री ९ वां,ह.भ.प. श्री सोपान महाराज सानप हिंगोली,यांचे कीर्तन होणार आहे.


दि,२४/०४/२०२४बुधवार सकाळी भव्यमिरवणूकशोभायात्रानिघणारआहे, ह.भ.प.श्री शिवानंद महाराज शास्त्री पैठण यांचे काल्याचे कीर्तन दहीहंडी व महाप्रसाद कार्यक्रम होणार आहे,दुपारी वाघ वानर नृत्य कार्यक्रम



रात्री कला मोहोस्थव होणार आहे,तरी या सर्व कार्यक्रमाचा लाभ भक्त गणानी घ्यावा असे आवाहन समस्त गांवकरी मंडळी, सुजलेगांव ता. नायगांव यांनी केले आहे

# जल जिवन योजना म्हणजे उंटावरुन शेळ्या हाकण्याचे काम , वरपगाव येथील कामांचा खोळाबा

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई/परवेज पटेल**
अबांजोगाई तालुक्यातील वरपगाव येथील जि, प, अतंर्गत डी, पी, व पाईपलाईनचे काम थाबंले , ठेकेदाराच्या हालगर्जिपणा मुळे दोन हजाराच्य जवळपास आसणार्या लोकसख्यंच्या गावाला दोन बोअरवर तहाण भागवण्याची वेळ तर हातपंप कोरडे , तर तिन बोअर पैकी एक बंद तर दोन बोअर गुच्चक्या देत देत महा वितरणाच्या वेळपत्रीके अधारे लफंडाव खेळत खेळत तहाण भागवतो तर गुत्तेदारी काम , सहा महीने थांब, आशीच वेळ वरपगाव येथील काम करणार्या व्यक्ती कडुन दिसुन येत आहे गेल्या आणेक महीन्यापासुन बंद पडलेले काम पाईप लाईन अर्धवट अवस्थेत तर डी. पी. नाही, तर पाणी पुरवठा नाही, जि.प. अतंर्गत राबवल्या जाणार्या योजना म्हणजे उंटावरुन शेळ्या हाकण्याचे काम तर जुन्या विहीरी, व कधीच न अटणार्या आडात पाणी शोधण्याची वेळ आल्याचे दिसुन आले, जल जिवन योजने अतंर्गत आलेल्या पाणी पुरवठाची कामे तात्काळ सुरवात करण्याची मागणी वरपगाव येथील ग्रामस्था कडुन होत आहे



# RPI मराठा आघाडी बीड जिल्हा अध्यक्षपदी नवनाथ तपसे यांची निवड

## अंबाजोगाईत सत्कार समारोह संपन्न.

वादळवार्ता/केज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे निष्ठावंत कार्यकर्ते नवनाथजी तपसे मराठा आघाडी बीड जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. डॉ. रामदास आठवले यांच्या आदेशानुसार मराठा आघाडी महाराष्ट्र राज्य अध्यक्ष मा. बाळासाहेब मिरजे पाटील यांनी मराठवाडा अध्यक्ष मा. रविराजजी पाटील यांच्या शिफारशीनुसार नवनाथजी



तपसे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. त्यानिमित्त रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया बीड जिल्हा कार्याध्यक्ष मा. संदिपानजी हजारे यांचे अध्यक्षतेखाली व RPI नेते महेंद्र निकाळजे त्यांच्या हस्ते संविधान देऊन सत्कार करण्यात आला. प्रस्ताविक केज तालुका अध्यक्ष मा.सुनील हिरवे यांनी केले प्रसंगी मोहम्मद रईसोदिन अन्सारी, बाबुराव गालफाडे, अंगद शिनगारे, सचिन ठोकळ, अमोल मस्के, भाऊराव होके, अशोक गडदे डॉक्टर, गोरख गायकवाड इत्यादी उपस्थित होते.

# माझ्या शेतात काय पिकते अन् काय विकते ? याचा अनुभव पालकमंत्र्यांना आहे !

## बजरंग सोनवणे यांचे सडेतोड उत्तर

वादळवार्ता/बीड
मी एक शेतकरी पुत्र असून मी माझ्या शेतात काय पिकवतो व काय विकतो ? याचा अनुभव विद्यमान पालकमंत्र्यांना आहे. कारण ते अनेक वेळा माझ्या सोबत माझ्या शेतात आलेले आहेत. असे खणखणीत प्रत्युत्तर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आणि इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बाप्पा सोनवणे यांनी दिले.

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी एका सभेत मी एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेला असून त्याचा मला सार्थ अभिमान आहे. त्यामुळे मी जन्माने शेतकरी पुत्र आहे. आणि शेतकरी पुत्र असल्याने शेतकऱ्यांच्या अडी अडचणी याची माहिती आहे. मी साखर कारखाना चालवीत असून त्यातून शेतकऱ्यांच्या उसाला मराठवाड्यात सर्वाधिक भाव देवून मी त्यांच्या कुटुंबाची व कामगारांना



रोजगार उपलब्ध करून दिला. म्हणून मी शेतकऱ्यांचा मित्र देखील आहे. असे एका सभेत बोलताना वक्तव्य करीत सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्मलेल्या भाजपच्या उमेदवार, पालकमंत्री आणि त्यांच्या नेत्यांना गरिब शेतकऱ्याचे सुख दुःख काय समजणार ? असा प्रश्न उपस्थित केला होता. त्यांच्या या प्रश्नाचा दाखला देत पालकमंत्री यांनी बजरंग बाप्पा हे शेतकरी पुत्र असले तरी त्यांच्या शेतात काय पिकते ? याचा शोध घ्यावे लागेल. असे म्हटले. त्याला उत्तर देताना बजरंग सोनवणे म्हणाले की, मी माझ्या शेतात मी काय पिकवतो ? आणि काय विकतो ? याचा प्रत्यक्ष अनुभव विद्यमान पालकमंत्री यांना आहे. कारण आम्ही सोबत काम करीत असताना ते अनेक वेळा माझ्या शेतात आलेले आहेत. त्यामुळे मी कशाची शेती करतोय ? हे त्यांना चांगलेच माहीत आहे. अशा शब्दात बजरंग बप्पा सोनवणे यांनी पालकमंत्र्यांना उत्तर दिले आहे.

# भगवानगडावरील माऊलींच्या मंदिरासाठी पाष्टा ग्रामस्थांची ४८ लाख रुपये देणगी



**वादळवार्ता/शिरूर कासार**
श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या २६ कोटी रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.

श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री. नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे पाष्टा (ता.जि.जालना) येथे सप्ताहानिमित्त आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही ४८ लाख रुपये झाली.

नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. या भव्य दिव्य मंदिरासाठी लागणारा खर्च अंदाजे २६ कोटी रूपये इतका आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# प्रशासन, लोकप्रतिनिधिनी लाज सोडल्यामुळे स्व.महेश राजेंद्र पाचंग्रे याच्या वाढदिवसानिमित्त पापनेश्वर मित्र मंडळाने स्वखर्चातुन बुजवला धोकादायक खड्डा.

**बीड प्रतिनिधी**
बीड शहरातील बार्शी रोडवरील स्वराज्य नगर जवळ तो धोकादायक खड्डा गेल्या अनेक महिन्यांपासून अपघात होण्याची वाट पाहत होता रोज तिथे न चुकता अपघात होत होते कित्येक लोकांना अपंगत्व आले तरी त्याचं खड्ड्यामध्ये दि २८/०९/२०२३ रोजी महेश राजेंद्र पाचंग्रे हा युवक साई मंदिर येथे आरतीसाठी जात असताना त्याचां अपघात झाला व पुढील उपचारासाठी त्यांना लोटस हॉस्पिटल येथे ऍडमिट करण्यात आले त्यांना वाचण्यासाठी खूप प्रयत्न झाले पण नियतीने शेवटी घात केलाच महेश पाचंग्रे यांचे ६ ऑक्टोंबर रोजी निधन झाले त्यानंतर त्यांची दखल ना प्रशासनाने घेतली ना लोकप्रतिनिधीनी त्या त्यानंतर सामाजिक कार्यकर्त्यांनी तो खड्डा तात्पुरत्या स्वरूपात बुजवून घेतला होता त्यानंतर प्रशासनाला वेळोवेळी सांगून देखील पत्रक काढून देखील त्याची दखल घेतली नाही ८ दिवसापूर्वी पाऊस झाला त्यानंतर तो खड्डा जशास तसा झाला आठ दिवसांमध्ये त्या खड्ड्यात तीन अपघात झाले तरी देखील प्रशासनाला लाज वाटली नाही पापनेश्वर मित्र मंडळ दोन दिवसात खड्डा बुजवावा असे आवाहन करून देखील तो खड्डा बुजवला नाही त्यामुळे आज दिनांक २० एप्रिल रोजी महेश पाचंग्रे यांचा वाढदिवस असायचा त्यामुळे पापनेश्वर मित्र मंडळाने व पाचंग्रे परिवाराने त्याच्या वाढदिवसानिमित्त तो खड्डा बुजवण्याचा संकल्प केला व आज तो धोकादायक खड्डा सिमेंट कॉंक्रेट करून स्वखर्चातून बुजवून घेतला त्यामुळे प्रशासनाला व लोकप्रतीनिधि यांना आणखीन एक विनंती आहे या रस्त्यातील खड्डे आपण बुजून घ्यावेत त्याच्या घरामध्ये माणूस जातो त्याला कळतं रस्त्यावरील खड्डे चे महत्व व समस्त बीडकरांनो कधीपर्यंत असे हाल सहन करणार आहात आवाज उठवा पुढे या आपल्या परिसरातील रस्त्यावरील खड्डे प्रशासनाने नाही बुजवल्यास आपण स्वतः स्वखर्च्यातून वर्गणी करून आपल्या परिसरातील खड्डे बुजून घ्या व अपघात होण्यापासून टाळा हीच कळकळीची विनंती.



# नवसाला पावणा-या बेनसुर च्या बेनाबाई ची आज यात्रा

**वादळवार्ता/पाटोदा**

बिंदुसरा नदीचे उगमस्थान असलेल्या पाटोदा तालुक्यातील बेनसुर येथील बेनाबाई ही देवी नवसाला पावणारी देवी म्हणून सुपरिचित आहे बेनसुर गावाचे नाव व मंदिराच्या मागील बाजूस उगम पावून बीड शहराचा पाणीप्रश्न सोडविणाऱ्या नदीची बिंदुसरा म्हणून ओळख झालेल्या बेनाबाई देवीची यात्रा दरवर्षीप्रमाणे रविवार ता २१ एप्रिल रोजी म्हणजेच चैत्र शुद्ध त्रयोदशी रोजी भरत आहे

माहुरच्या रेणुकामातेचा अवतार म्हणून बेनाबाई देवीची ओळख आहे बेना नावाच्या राक्षसाचा वध केल्याने देवीचे हे नाव पडल्याची आख्यायिका आहे या देवीच्या दर्शनासाठी दूरवरून भाविक येतात या यात्रे निमित्ताने चैत्र शुद्ध त्रयोदशीला मोठी यात्रा भरते यात्रेच्या दिवशी दिवसभर धार्मिक कार्यक्रम असतात यामध्ये देवीच्या परड्या, दर्शन, भंडारा व रात्री पालखीची मिरवणूक असे कार्यक्रम असतात या यात्रेप्रमाणेच नवरात्रातही नऊ दिवस विविध धार्मिक कार्यक्रम असतात व श्रावणातही पालखी असे भरपूर कार्यक्रम असतात नवसाला पावणारी दैवी म्हणून ओळख असल्याने देवीच्या दर्शनासाठी वर्षभर भाविक येत असतात.

बेनाबाईदेवीमंदिरवपरिसराचासर्वांगीण विकास करणार - गणेश आरसुळ

बिंदुसरा नदीचे उगमस्थान व गावालाही नाव देणारी बेनाबाई देवी गावचे आराध्य दैवत असून या देवीचे मंदिर व परिसराचा विकास करण्यासाठी मंदिरास २० गुंठे जागा असून या सर्व जागेशी कुंपण व त्याबरोबर मंदिराचाही विकास करण्याचा आमचा विचार असल्याचे उपसरपंच गणेश जालिंदर आरसुळ यांनी सांगितले.




## अंमळनेरचे किराणा मालाचे प्रसिद्ध व्यापारी तथा माजी उपसरपंच सुधाकर आप्पा पवार यांचे निधन

वादळवार्ता/पिंपळवंडी

पाटोदा तालुक्यातील अंमळनेर येथील माजी उपसरपंच तथा किराणा मालाचे प्रसिद्ध व्यापारी सुधाकर (आप्पा) भानुदास पवार (६५)यांचे अल्पशा आजाराने अंमळनेर येथील त्यांच्या राहत्या घरी गुरुवारी रात्री दुःखद निधन झाले आहे. शांत मनमिळावु व्यक्तिमत्व असलेले सुधाकर पवार यांना गावातील सर्व लहान मुलापासून थोर व्यक्तीपर्यंत आप्पा या त्यांच्या टोपण नावाने ओळखले जायचे.तसेच आप्पांचे सामाजिक,धार्मिक क्षेत्रात मोठे योगदान असायचे.अंमळनेर व अंमळनेर परिसरात आप्पा नावाचे मोठी व्यापारी व्यक्तीमत्व होते . सुधाकर आप्पांचा शांत,संयमी नेतृत्व म्हणून अंमळनेर परिसरात मोठा बोलबाला असायचा. पूर्वी आप्पांचा तुपाचा व्यवसाय होता.अंमळनेरचे जुने गणेशमंदिर बांधकामासाठी त्यांचा मोठा सिंहाचा वाटा होत. गावात प्रत्येक रविवारी चित्रपट दाखवुन मंदिर बांधकामासाठी निधी उभारण्यासाठी योगदान होते.ग्रामपंचायतीच्या भव्य पटांगणात हा आवाज आला की, चित्रपटाची पेटी आली,वडे आला,आज पिक्चर होणारच असा निश्चय मानला जायचा. अंमळनेर प्रसिद्ध तुपाचे व्यापारी म्हणून अहमदनगर येथे त्यांचे नाव झाले होते. अंमळनेर गावचे उपसरपंच म्हणून पाच वर्षे ग्रामपंचायत मध्ये त्यांचा कार्यकाळ राहिला होता.काही वर्षापासून आप्पा हे मधुमेह या आजाराने ग्रस्त होते. तसेच त्यांची सहा महिन्यापासून मधुमेह व बीपी (शुगर)वाढल्यामुळे तब्येत ढासाळली होती.अचानक १९ एप्रिल रोजी आप्पाचे दुःखद निधन झाले.त्यांच्यावर शोकाकुल वातावरणामध्ये अंमळनेर येथील त्यांच्या शेतात शुक्रवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.याप्रसंगी अंमळनेर परिसरातील व्यापारी,ग्रामस्थ ,



## रामराजे लोणकर यांची स्वराज्य शक्ती सेनेच्या गेवराई तालुका अध्यक्ष पदी निवड



**उमापूर प्रतिनिधी**

रामराजे लोणकर यांची स्वराज्य शक्ती सेनेच्या गेवराई तालुका अध्यक्ष पदी निवड करण्यात आली यावेळी त्यांचा स्वराज्य शक्ती सेनेच्या संस्थापक अध्यक्ष करूणा मुंडे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.मागील काही दिवसापासून सामाजिक समाजसेवक कार्य करत असलेले रामराजे लोणकर त्यांची कार्याची दखल घेऊन त्यांची तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. तसेच त्यांच्या पुढील वाटचालीसाठी जिवन यादव, सचिन लोणकर, नितीन लोणकर,फड सर, विलास मस्के, रमेश मस्के,अशोक लोणकर, राजेद्र देवकते, नितीन देशमुख यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# धारूर नगरपालिका अंतर्गत अग्निशामक सेवा सप्ताह संपन्न.




**वादळवार्ता/किल्ले धारूर**

धारूर नगरपालिकेत महाराष्ट्र अग्निशामक सेवा संचालक एस एस वारीक यांच्या आदेशाने महाराष्ट्रात दि.१४ ते २० एप्रिल अग्निशामक सेवा सप्ताह चे आयोजन करण्यात आले होते. याच अनुषंगाने धारुर नगरपालिकेतही अग्निशामक सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते ,यात तालुका शहरांमध्ये जनजागृती करून सप्ताह संपन्न केला.

धारूर नगरपालिकेमध्ये महाराष्ट्र अग्निशामक सेवा संचालक एस एस वारीक यांच्या आदेशाने दि. १४ ते २० एप्रिल दरम्यान आग्निशामक सेवा सप्ताहचे आयोजन मुख्याधिकारी महेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. दि.१४ एप्रिल १९४४ रोजी मुंबई येथील गोदीत एस एस फोर्ट स्टिकिंग या जहाजाला स्फोट होऊन लागलेल्या भीषण आगीत झुंज देताना अग्निशामक दलाच्या 66 जवानांना हुतात्मे प्राप्त झाले होते.तसेच त्यानंतरही अग्निशामक कार्य करत असताना जे हुतात्मे झालेले अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या स्मृती प्रित्यर्थ तसेच जनतेमध्ये जनजागृती निर्माण होण्यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी केंद्रीय गृहमंत्री नवी दिल्ली यांच्या सूचनेने सर्व देशभरात अग्निशामक सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. यामध्ये धारूर नगरपालिका अंतर्गत मुख्याधिकारी महेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १४ एप्रिल ते २० एप्रिल दरम्यान अग्निशामक सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यात विविध भागामध्ये अग्निशामक वाहन व तेथील कर्मचारी यांनी शहरांमध्ये जनजागृती करण्याचे काम करण्यात आले. यामध्ये केंद्रीय गृहमंत्री कार्यालयाने घोषवाक्य दिलेले "अग्नि सुरक्षा सुनिश्चित करा राष्ट्र उभारणीत योगदान भरा" याचा नारा देत अग्निशामक सेवा सप्ताह २० एप्रिल शनिवार रोजी धारूर येथील बस स्थानक येथे सप्ताहाचा शेवट करण्यात आला. यावेळी प्रवासी, बस चालक - वाहक नागरिक आधीच्या उपस्थितीमध्ये आग लागल्यानंतर सुरक्षेसाठी काय करायचे यासाठी उपस्थितांना सांगण्यात आले.तसेच आगीचा काही अपघात झाल्यास संपर्क करण्यासाठी यावेळी नगरपालिकेच्या अग्निशामक कर्मचाऱ्यांनी नागरिकांना आव्हानही केले. यावेळी अग्निशामक दलाचे बालाजी शिनगारे, विकास गायसमुद्रे, तसेच आगारातील वाहक, चालक, कर्मचारी, प्रवासी, नागरिक, पत्रकार उपस्थित होते.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )